# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.01.2025** **वार- रविवार**

---

**<u>प्रजासत्ताकदिन</u>**

७६वा प्रजासत्ताक दिन आज पुणे शहर आणि जिल्ह्यात अत्यंत उत्साहात साजारा करण्यात आला. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शिवाजीनगर इथल्या पोलीस कवायत मैदानात ध्वजवंदन केलं. यावेळी शानदार संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. गेल्या 75 वर्षात देशासमोर अनेक संकटे आली, परंतु देश कुणापुढे झुकला नाही. डगमगला नाही. भक्कम उभा राहीला, असं अजित पवार यावेळी म्हणाले. पवार यांच्या हस्ते ॲग्री स्टॅक योजेनाच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचं वितरण करण्यात आलं. तसंच 'पीएमआरडीए'च्या आपत्ती प्रतिसाद दलासाठी वाहनांचं लोकार्पण करण्यात आलं.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि शनिवारवाडा इथं जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आलं.

पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी महापालिका मुख्य भवनात ध्वजवंदन केलं. तत्पूर्वी आयुक्तांनी महापालिकेच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

पिंपरी चिंचवड महापालिकेत आयुक्त शेखर सिंह यांनी राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला वंदन केलं. महापालिकेचे सुरक्षारक्षक दल, अग्निशमन दल, महाराष्ट्र सुरक्षा बलानं यावेळी पथसंचलन केलं.

प्रजासत्ताकदिनानिमित्त सर्वच शासकीय इमारतींना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

पिंपरी इथल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या शेजारील मैदानात "हम भारत के लोग" हा संविधानावरील गीत गायनाचा कार्यक्रम होत आहे. यात मराठीसह, हिंदी, इंग्रजी, पंजाबी, गुजराती अशा विविध १५ भाषांमधून संविधानाच्या प्रस्ताविकेचं गायन करून संविधानाला सांगीतिक मानवंदना देण्यात येत आहे. या उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात येणार आहे.

लष्कराच्या पुण्यातील दक्षिण मुख्यालायातही प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. युद्ध स्मारकावर हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शहर आणि जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयं तसंच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही ७६वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या स्थापना दिनी देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांनी यावेळी केली. एनसीसीच्या छात्रांनी संचलन केलं.

विविध संस्था, संघटना आणि गृहनिर्माण संस्थांमध्येही आज प्रजासत्ताक दिनानिमित्त सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएलनं प्रजासत्ताक दिनाचं औचित्य साधत प्रवाशांसाठी तीन नवीन सुविधांची भेट दिली. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते या सुविधांचं लोकार्पण करण्यात आलं. आपली पीएमपीएमएल मोबाईल ॲपचे आयओएस व्हर्जन, बस लाईव्ह ट्रॅकिंग प्रणालीचे वेब व्हर्जन आणि महामंडळाच्या स्वमालकीच्या बसेसमध्ये एल.ई.डी. बोर्ड आणि नेक्स्ट स्टॉप अनाऊन्समेंट प्रणाली या सुविधा आज सुरू करण्यात आल्या आहेत.

**गुइलेनबॅरीसिंड्रोममोफतउपचार**

गेल्या काही दिवसांपासून गुइलेन बॅरी सिंड्रोम या दुर्मिळ आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. आतापर्यंत या आजाराने दोन जण दगावले आहेत. हा आजार असलेल्या रुग्णांची संख्या ७३ झाली आहे. काही रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर असून या आजाराचा खर्च देखील मोठा आहे. त्यामुळे या आजारावर मोफत उपचार केले जातील अशी घोषणा उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात केली. जीबीएस आजारावर पुण्यातील कमला नेहरु रुग्णालयात मोफत उपाचार करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**सूर्यनमस्कार**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि आशाकिरण सोशल फाऊंडेशननं येत्या 4 फेब्रुवारीला जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सूर्यनमस्कार महोत्सवाचं आयोजन केलं आहे. शहरातील विविध ठिकाणी ही मोहीम राबवली जाईल. यात विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**इम्प्रेसगार्डन**

एम्प्रेस बोटॅनिकल गार्डनमध्ये सुरू असलेल्या पुष्प प्रदर्शनाला आज नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये विविध फुले, भाजीपाला, बोन्साय अशा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. विविध फुलांच्या पाकळ्यांनी दिवंगत पंडित भीमसेन जोशी आणि गानकोकिळा लता मंगेशकर यांचं पुष्पचित्र साकारण्यात आलं आहे. उद्यापर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

**कुस्ती**

अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या ६७व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची पुणे जिल्हा निवड चाचणी नुकतीच झाली. या स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळ हा महाबली चषकाचा मानकरी ठरला. त्याचबरोबर अभिजीत भोईर, भालचंद्र कुंभार, अमोल वालगुडे, आणि प्रतीक देशमुख यांची पुणे जिल्हा संघात निवड झाली आहे. पुणे जिल्ह्यातील ४५०हून अधिक कुस्तीगीरांमध्ये ही लढत झाली.

**कामतनिधन**

संतवाङ्मयाचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांचं आज सकाळी पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधनझालं, ते ८३ वर्षांचे होते. वारकरी संप्रदायाबरोबरच, नाथ, आणि समर्थ संप्रदाय,वीरशैव आणि सिख्ख संप्रदायाचा भारतीय पातळीवर तौलनिक विचार करणारे त्यांचे अनेकग्रंथ, शोधनिबंध प्रसिद्ध आहेत. सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठातील नामदेव अध्यासनाचं प्रमुखपद त्यांनी अनेक वर्ष सांभाळलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. कमाल तापमान ३५ तर किमान तापमान १४ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि आकाश निरभ्र असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**